Exh. 1/C

# मे. जिल्हा न्यायाधीश साहेब केज यांच्या न्यायालयात.

जामीन अर्ज क्र.- 62 /२०२६

अर्जदार- १. सुमेर पि. भोराराम सिंह चौधरी , वय- ३२ वर्ष,
धंदा- धंदा- हॉटेल व्यवसाय, रा. बनाड, ता. मंदौर,
जि. जोधपुर, ह. मु. धारूर, ता. धारूर, जि. बीड
२. ओमाराम पि. भीखाराम जाट, वय- ३४ वर्ष,
धंदा- हॉटेल व्यवसाय, रा. नवीन सजादा खुर्द, ता. लुणी,
जि. जोधपुर, ह. मु. धारूर, ता. धारूर, जि. बीड

<u>विरुद्ध</u>

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन

प्रकरण- कलम ४८२ बी. एन. एस. एस. प्रमाणे अटकपूर्व जामीन मिळणेबाबत

गु. र. नं. - ०८/२०२६, दिनांक- १३/०१/२०२६

पोलिस ठाणे - लुणी, ता. लुणी, जि. जोधपुर
धारूर, ता. धारूर, जि. बीड (झिरो एफ. आय. आर.)

गुन्ह्यांचे कलम- भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२), ३(५), १२७(३) सह अ. जा. ज. प्रतिबंधक कायदा १९८९ चे कलम ३(१)(r), ३(१)(s), ३(२)(va)अन्वये

## अर्जदारांचा विनंती अर्ज खालीलप्रमाणे सविनय सेवेत सादर -

१. असे की, प्रस्तुत गुन्ह्यातील फिर्यादी नामे कालूराम कन्नाराम याने पोलिस ठाणे लुणी जि. जोधपुर येथे दिलेली तक्रार ही धारूर पोलिस ठाणे येथे झिरो एफ



Scanned with OKEN Scanner

आय आर नुसार नोंद झाली असुन फिर्यादीने दिलेली कथकाथित तक्रार ही खालीलप्रमाणे-

महोदयजी,

उपरोक्त विषयान्तर्गत निवेदन है की मै कालुराम पुत्र कन्नाराम जाती भील निवासी नयासजाडा खुर्द पोलीस थाणा लुणी यह है का उमाराम पुत्र भिकाराम जाती जाट निवासी नयसजाडा खुर्द, सुमेर पुत्र महराराम जातीय जाट निवासी गुजरावास अपणी महाराट्र जि. बीड तहसील किले धारूर स्थित जलेबी की दुकान पर कामकाज करणे हेतु लेकर गये । जहा मे करीब ०३ माहसे काम कर रहा था । मेरी पत्नी गर्भवती थी । जिसकी डीलीवरी होणी थी, तभी मैंने उमाराम व सुमेर से आपणे गाव जाने के लिए छुटी मांगी व तनखा माँगी लेकीन इन लोगोने मुझे गाँव जानेसे मना कर दिया । तथा रूपये भी नही दिये । कुछ दिन बाद 22/12/2025 की रात एक बजे इन दोनोंने मिलकर मेरे साथ बुरी तरफसे मारपीट किई । मेरे दोन्हे पैर बांधकर मुझे रातभर दुकानमे बंद रखा । मेरे दोन्हे पैर बांधरप प्लॉस्टीक की नली बुरी तरह मारा तथा घर जाण की बात करने पर जान से मारणे की धमकी दि । इन लोगोने मेरे साथ गाली गलौच करते हुये मुझे जाती सुचक शब्द भीलडा (रुंग्गा) बोलकर जलील किया मेरे पैर बांधकर मुझे रातभर दुकानमे बंद रखा । इन लोगोने मेरे साथ मारपीठ करते हुए व्हीडीओ बनाया । जो मेरे पास मौजुद है । मैं बेहोश हो गया आगे का मुझे पता नही । मेरा मोबाईल छीन लिया तथा दि. 24/12/2025 को उमाराम मुझे मध्यप्रदेश लेकर आये जिल्हा मन्दसौर तहसील गरोड मै दि.28/12/2025 तक बन्धक बनाकर रखा व मेरे साथ मारपीट की और मुझे धमकीया दी उक्त मारपीठ करते रहे धमकीया देते रहे की तेरे घरवालोको बोल की व्हीडीओ डीलीट कर नहीं तो मैं जानसे मार देंगे और कही फेक देंगे और घरवालोको बोलेंगे की यहाँसे निकल गया झुटामुकदमा दर्ज करवा देंगे, यह है मेरे साथ हुई मारपीठ का व्हीडीओ इन लोंगोने व्हायरल कर दिया था जो मेरे चाचा व घरवालोने देखा मुझे वहाँसे छुडवाकर लेकर आये ।

अंत आप श्रीमान जी से निवेदन है की दोषीयोके खिलाफ जल्द उचित कानुनी कार्यवाही कर मुज प्रथीको न्याय दिलाने की कृपा करावे. एस बी कालुराम



Scanned with OKEN Scanner

मो. नं. 9166362884 पोलीस ठाणा लुणी दि 02/01/2026 समय इस समय प्रर्थीश्री कालुराम पुत्र कन्नाराम जातीय भील उम्र 29 वर्षे निवासी नया सजाडा खुर्द पोलीस थाणा लुणी ने उपस्थीत थाना होकर पेश की मजणुन रिपोर्ट से मामला अपराध 115 (2), 3 (5), 127 (3) BNS का होना पाया गया व 3 (1) (R) (S), 3(2) (VA) sc st Act का पाया जाणे एव घटना पुलीस थाणा धारूर जिल्हा बीड महाराष्ट्र की होणे पर नियमानुसार ZERO FIR कला की जाकर एफआयआर की प्रति प्रार्थी को नि शुल्क उपलब्ध करवाई जा रही है प्रकरण में कार्यवाही हेतु प्रार्थी को पुलीस थाणा धारूर जिल्हा बीड महाराष्ट्र मे उपस्थित होनो की हीदायत की गई ZERO FIR की प्रतिया नियमानुसार जारी की जा रही है l एसही कालुराम एसडी प्रेमराज सउनि ड्युटी अधिकारी पुलीस थाणा लुणी जोधापुर.

या आशयाची कथाकथित खोट्या आणि बनावट स्वरूपाची तक्रार दाखल केली आहे. सदर फिर्याद ही लुणी जि. जोधपुर पोलिस ठाण्यात नोंद होऊन नियमानुसार झिरो एफ आय आर नुसार धारूर पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

२. असे की, अर्जदार यांनी कोणताही गुन्हा केलेला नसून अर्जदार हा पूर्णतः निर्दोष आहेत. अर्जदार यांच्या विरुद्ध यापूर्वी कोणत्याही गुन्ह्यांची नोंद नाही. तसेच, कोणतेही फौजदारी प्रकरण देखील कोणत्याही मा. न्यायायलयात प्रलंबित नाही.

३. असे की, अर्जदार हे अत्यंत गरीब कुटुंबातील होतकरू तरुण असुन अर्जदार स्वतः मौजे धारूर येथे जिलेबी विक्री करण्याचा व्यवसाय करून त्यांची व त्यांचे कुटुंबियांची उपजीविका भागवितात. तसेच, अर्जदार हे मौजे धारूर वास्तव्य करणारे असुन त्यांना त्यांचे स्वतःचे हॉटेल व्यवसाय करण्यासाठी भाडे तत्वावर घेतलेली स्थावर मिळकत आहे. त्यामुळे अर्जदार हे मा. न्यायालयाच्या न्यायक्षेत्राचे बाहेर पलायन करण्याची कोणतीही शक्यता नाही.



Scanned with OKEN Scanner

४. असे की, प्रस्तुत गुन्ह्यातील फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीचे बारकाईने अवलोकित केले असता सर्वप्रथम निदर्शनास येणारी बाब म्हणजे फिर्यादीने दिलेली तक्रार ही अर्जदार यांच्या विरुद्ध बनावट आणि काल्पनिक स्वरूपची दिसून येत आहे. कथाकथित फिर्यादीनुसार तक्रारदार हा अर्जदार यांच्याकडे हॉटेल मध्ये काम करण्यासाठी म्हणून मजुरीने काम करत होता.

५. असे की, अर्जदार यांच्याकडे कामावर असताना तक्रारदार यास दिनांक २२/१२/२०२५ रोजी अर्जदार यांच्याकडून मारहाण आणि शिवीगाळ झाल्याचे त्याने कथन केले असुन जर अर्जदार यांच्याकडून तक्रारदार यास खरच मारहाण अथवा शिवीगाळ करण्यात आली असती तर तो स्वतः घटनेच्या न्यायक्षेत्रातील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करू शकला असता. परंतु, तसे न करता केवळ अर्जदार यांच्याकडून तक्रारदार याने उचल (advance) स्वरूपात घेतलेली रक्कम परत अर्जदार यांनी मागू नये यासाठी आणि उलट अर्जदार यांच्यावर खोटी केस दाखल करून आर्थिक फायदा करून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुतची खोटी फिर्याद ही तक्रारदार याने अर्जदार यांच्या विरुद्ध दाखल केली आहे. तसेच, कथाकथित घटना घडल्यापासून फिर्यादिस फिर्याद देण्यास विलंब झाल्याचे कोणतेही कारण गुन्ह्याचे दाखल तक्रारीमध्ये दिसून येत नाही.

६. असे की, फिर्यादीने पोलिस ठाणे लुणी जि. जोधपुर येथे दाखल केलेली फिर्याद आणि त्यामधील कथाकथित फिर्यादीप्रमाणे अर्जदारांच्या विरुद्ध कोणताही गुन्हा सिद्ध होत नाही. तसेच, संबंधीत पोलिस अधिकाऱ्याने लावलेली गुन्ह्याची कलमे ही अर्जदारांचे विरुद्ध आकर्षित होत नाहीत.

७. असे की, अर्जदार हे मा. न्यायालयाच्या आदेशप्रमाणे मा. न्यायालय अर्जदारांना ज्या शर्थी व अटींवर जामीन मंजूर करील त्या शर्थी व अटींचे अर्जदार तंतोतंत पालन करण्यास तयार आहेत. त्यात अर्जदार कसलाही कसूर करणार नाहीत. अर्जदार हे मा. न्यायालयाचे आदेशानुसार जामीन देण्यास तयार आहेत.

करीता, मे. साहेबांनी अर्जदारांचा प्रस्तुतचा जामीन अर्ज मंजूर करून अर्जदारांना जामीनवर मुक्त करणे न्याय व योग्य आहे.



Scanned with OKEN Scanner

## तरी विनंती की,

मे. साहेबांनी अर्जदारांचा प्रस्तुतचा जामीन अर्ज मंजूर करून अर्जदारांना जामीनवर मुक्त करणेची कृपा करावी.

दिनांक- २५/०२/२०२६

मार्फत

अॅड. ए. जे. देवधारे, केज

Order
Issue Notice to State
& Complainant

Digitally signed by SUDHIR BABURAO BHAJIPALE
Date: 2026.02.26 17:18:08 +0530



Scanned with OKEN Scanner